MHNG130004742014

**दिवाणी दावा क्र.२५/२०१४**
**गुलाब व १ .वि. उषा**

**निशाणी क्र.५९ खालील आदेश**
(दिनांक ४ जुलै, २०१९)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता केलेला आहे. दाव्यातील विनंती कलम ३(अ) मध्ये दुरूस्ती करून काही मजकुर कमी करणे आहे. सबब, ती दुरुस्त करण्यास वादीने परवानगी मागितली आहे. प्रतिवादीने सदर अर्जास विरोध केला असून सदर अर्ज हा पुरेशे कारण न देता पुराव्याच्या वेळी दाखल केलेला आहे त्यामुळे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

२. वादीकरीता ॲड.श्री पी.बी.बांते व प्रतिवादीकरीता श्री.किशोर नवरे यांचा युक्तिवाद ऐकला. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये कोणत्याही पक्षकाराला दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये त्याच्या कथनामध्ये त्यांच्यातील मुख्य वाद मुद्दा निवारण करण्याच्या अनुषंगाने असणारी आवश्यक ती दुरुस्ती करता येईल अशी तरतुद आहे. वादीने विनंती कलम ३(अ) मध्ये दुरूस्ती करून दस्त रद्द करण्याबाबतचा मजकुर कमी करण्याकरीता परवानगी मागितलेली आहे. सदरची दुरुस्ती करण्यास वादीला परवानगी दिली, तरी त्याबाबत प्रतिवादी हे आपले म्हणणे मांडू शकतात. त्यामुळे प्रतिवादीला या दुरुस्तीने हानी पोहचू शकत नाही. सदर दावा अग्रहक्काचा असल्याने सदर दुरूस्तीने दाव्याचे स्वरूप बदलत नाही. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करणे योग्य व संयुक्तिक होईल असे माझे मत आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. निशाणी क्र.५९ वरिल अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीला मागणी केल्याप्रमाणे दुरूस्ती करून विनंती कलम ३(अ) मधील कमी करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादीने दिनांक १५/०७/२०१९ पर्यंत दुरुस्ती करावी.

स्वा/-
(मा. ये. वाघ)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
रामटेक

दिनांक : ०४/०७/२०१९
रामटेक

DISTRICT COURT NAGPUR